॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

नोव्हेंबर
२०२२

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org



## महात्मा
## जोतिबा फुले

**जन्म - ११ एप्रिल १८२७,**
**मृत्यू - २८ नोव्हेंबर १८९०**

सत्याचा जिव्हाळा मनाची स्वच्छता ॥
चित्तास स्वस्थता ॥ जेथे आहे ॥
जेथे जागा धीर सदा हृदयात ॥
सत्य वर्तनात । खर्ची द्यावा ॥
पिडा दुःखे सोशी संकटे निवारी ॥
गांजल्यास तारी ॥ जगामागी ॥
धीर धरूनिया सर्वा सुख देती ॥
यशवंत होती ॥ जोती म्हणे ॥

- महात्मा जोतिबा फुले

## विनम्र
## अभिवादन

# शाखा विभाग

'स्व'-रूपवर्धिनीच्या मनुष्य जडणघडणीच्या प्रयोगातील महत्त्वाचा भाग म्हणजे निवासी शिबिरे. शाखा विभागाचे यावर्षीचे हिवाळी शिबिर ३ ठिकाणी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत संपन्न झाले.

● **भाग १ व ३ –** विषय – स्वातंत्र्याची ७५ वर्षे. शिबिरार्थी संख्या – १८०, शिबिर प्रमुख – अक्षय मुळे, शिबिर स्थळ – क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके स्मृती विद्यालय, रावडी, ता. भोर, जि. पुणे.

● **भाग २ व ४ –** विषय – स्वतंत्र भारताची समर्थ वाटचाल, संख्या – १८०, शिबिर प्रमुख – सावतामाळी साळुंखे, रामेश्वर विद्यालय, विंग, ता. भोर जि. पुणे

● **भाग ५** (वर्धिका गट) विषय – मैत्री, संख्या – ८०, शिबिर प्रमुख – पायल जिरेसाळ. स्थळ – पुणे विद्यापीठ.

● **शिबिर स्थळाचा शोध :** गेली अनेक वर्ष आपली शिबिरे ही पुणे शहर परिसरात होत होती. आम्ही जेव्हा लहान होतो तेव्हा शिबिर ग्रामीण भागात होण्याचे प्रमाण जास्त होते. यावर्षी देखील हे शिबिर ग्रामीण भागात व्हावे यासाठी भागप्रमुखांनी आग्रह धरला. त्यामुळे दोन शनिवार, रविवार आम्ही सगळयांनी तळेगाव, मुळशी, खडकवासल्याच्या मागील भागातील गावांमध्ये, भोर तालुका अशा ठिकाणी शिबिर स्थळ शोधण्यासाठी भ्रमंती केली. ऐन पावसाच्या भरवशावर तंबू-राहुट्या शिबिर किती प्रमाणात यशस्वी होईल याबाबत साशंकता होती, पण आम्ही निर्धार केला होता हे शिबिर तंबू-राहुट्यांमध्ये यशस्वी करण्याचा आणि त्या पद्धतीने आम्ही योजना आखत होतो.

● **युवक स्तरावर पूर्वतयारी :** शिबिर तंबू – राहुट्यांमध्ये होणार असल्याने युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण होतेच. अनेक युवकांनी आपल्या कार्यक्षेत्रावर रजा टाकून अधिकच्या सुट्ट्या मागून या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी पसंती दर्शवली. त्यामुळे आम्हा सगळ्या आयोजकांचा उत्साह द्विगुणीत झाला.

● **शिबिराचा एकत्रित परिणाम :** वर्धिनीची शिबिरे व्यक्तिमत्त्व विकास साधणारी आणि स्वावलंबन शिकवणारी असतात. या दृष्टीने आपण या शिबिरामध्ये एक दिवस गटशः भोजन करण्यासाठी मुलांना साहित्य दिले, याचा परिणाम असा झाला की एखादी कृती मिळून करण्यातील महत्त्व मुलांना कळले. कोरोनानंतर अनेकांचे हे पहिलेच ग्रामीण शिबिर होते. ग्रामीण भागात शिबिर असल्याने मुलांमध्ये चैतन्याचे वातावरण होते. तसेच उत्साह दिसून येत होता. शहरापासून आपण शिबिरासाठी दूर आलेलो आहोत आणि या शिबिरातून आपण काहीतरी चांगलं घेऊन जावू अशी भावना प्रत्येक युवकामध्ये होतीच तशीच प्रत्येक वर्धकामध्ये दिसली.

**– अक्षय मुळे**

* * *

विंग गावातील रामेश्वर विद्यालयात शाळेचे मुख्याध्यापक श्री. राऊत सर व श्री. अमोल लोखंडे यांच्या उपस्थितीत भाग २ व ४ च्या शिबिराचे उद्घाटन दि. २७ ऑक्टोबरला झाले. दि. २८ ते दि. १ नोव्हेंबर या काळात विविध सत्रे झाली.

● **प्रबोधन सत्र :** रोज सकाळची सुरुवात या सत्राने झाली. प्रथमेश राजगुडे दादाने श्री. वर्गीस कुरियन व अभय पोते दादाने चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके, निलेश धायरकर सरांनी प्रसिद्ध अंतराळ रॉकेट शास्त्रज्ञ नंबी नारायण यांच्या जीवन चरित्रातील प्रेरणादायी गोष्टी सांगितल्या. शुभम जगताप दादाने विश्वविजेता भारत व भारताची प्रगती यावर मार्गदर्शन केले.

● **कृतिसत्र :** ग्रामीण प्राथमिक व्यवसायांची माहिती विंग गावातील शेती, पशुपालन, कुक्कुटपालन, सेंद्रीय शेती, शर्यतीच्या बैलांचे पालन-पोषण, बांबू, हे व्यवसाय करणाऱ्या गावकऱ्यांशी प्रत्यक्ष भेटीतून मुलांनी घेतली. यातील काही शेतकरी श्री. सुभाष तांगडे (आंबा बागाईतदार), श्री. माणिक पाटील (सेंद्रीय शेती), श्री. समीर शेडगे (राजेवाडी गावचे सरपंच) यांच्या मुलाखतीतून मुलाशी संवाद झाला.

● श्री. प्रमोद खांडेकर सरांनी 'गेल्या ७५ वर्षातील भारतीय वैज्ञानिकांचे योगदान' हा विषय गोष्टीरूपातून मांडला.

● पोखरण अणुचाचणीवर आधारित 'परमाणू' हा चित्रपट मुलांनी बघितला व त्यावर गटचर्चा झाली.

● श्री. विलास कुलकर्णी सरांनी 'विज्ञान शाप की वरदान' ही चर्चा घेतली.

● श्री. श्रीकांत यादव सरांनी 'चित्रपटसृष्टीतील प्रगती' हा विषय मांडला.

● **स्पर्धा :** * गावात पाहिलेल्या प्राथमिक व्यवसायांवर आधारित आकाशवाणीसाठी जाहिरात करणे.

* दिलेल्या साहित्यातून फोटोच्या आधारे क्षेपणास्त्रांच्या प्रतिकृती बनवणे उदा. पृथ्वी, अग्नी.

* क्षेपणास्त्रासंबंधी पोस्टर बनवणे.

* 'भारत जोडो' या संकल्पनेवर आधारित खजिना शोध.

* गीत गायन – भारताची प्रगती व कीर्ती लक्षात येईल अशी गीते रामेश्वर मंदिरात गावकऱ्यांच्या उपस्थितीत सादर झाली.

● **समारोप :** वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. उदय गुजर व श्री. विजय नवले यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला. त्यांनी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देऊन वर्धकांचे कौतुक केले. श्री. गुजर सरांनी वर्धिनीच्या प्रार्थनेतील 'जनांचा प्रवाहो इथे चाललेला...' या कडव्याचा अर्थ स्पष्ट करत भारतमातेची वेगवेगळ्या रीतीने सेवा करण्यासाठी सर्वांना प्रेरित केले.

* * *

आपल्या शाखेत येणाऱ्या वर्धक-वर्धिका यांच्याशी मैत्री दृढ व्हावी, टिकून रहावी यासाठी आधी स्वतःशी मैत्री करून घ्यायला हवी. मोबाईलपेक्षाही आपल्यामध्ये काहीतरी भारी आहे याची जाणीव झाली पाहिजे. गेली दोन ते अडीच वर्षे कोविडमुळे, मोबाईलमुळे हे कुठेतरी हरवत चालले होते. आरोग्य व्यवस्थित असायला हवे, नियोजन व्हायला हवे, म्हणून मैत्री स्वतःशी, मैत्री आरोग्याशी महत्त्वाची.

● **भाग ५ च्या शिबिराचे उद्घाटन :** मैत्री कोणाशी करावी आणि कोणाशीही मैत्री करताना चौफेर विचार कसा करावा, मैत्रीचे आयाम हे श्रीमती बागेश्री पोंक्षे (दीदी) यांनी सांगितले.

शिबिरात दि. २८ ऑक्टोबर ते दि. ३१ ऑक्टोबर खालील सत्रे झाली –

● **स्पर्धा :** प्रतिकृती बनवणे ही स्पर्धा दोन विषयात झाली. लहान गटात 'आरोग्य केंद्र' – मुलींनी आरोग्य केंद्रात कोणकोणत्या उपाययोजना आहेत ते दाखवले. मोठ्या गटात 'पोषक आहार पदार्थ बनवणे' – यामध्ये त्यांना काकडी, टोमॅटो, कांदा हे मुख्य साहित्य दिले होते आणि हे पदार्थ न शिजवता त्यांनी पदार्थ तयार केले.

● **व्याख्याने – लहान गट :** १) वक्ते – सुरेशदादा पवार, विषय – मैत्री स्वतःशी. दादाने विविध कृती आणि खेळातून नियोजनाचे महत्त्व सांगितले आणि स्वतःशी मैत्री करताना दिनक्रम पक्का असायला हवा असा आग्रह धरला.

२) वक्ते – दिव्या घारे ताई – विषय – कुटुंबवत्सल वृक्ष Family Tree Diagram - ताईने आपल्या घरात कोण कोण राहतात, ते कोणत्या क्षेत्रात काम करतात, त्यांचा वाढदिवस कधी असतो, या बाबींसह वृक्ष काढून घेतला.

३) वक्ते – संदीप मोरे सर – विषय –मैत्री वर्धिनीशी – सरांनी वर्धिनीची स्थापना, संस्थापकांचे पूर्ण नाव, कोणकोणते विभाग आहेत, ते विभाग कोणकोणते काम करतात याआधारे ओळख करून दिली.

● **मोठा गट :** वक्ते – १) श्री. विश्वास कुलकर्णी सर, विषय – मन. 'मन वढाय वढाय...' या काव्यपंक्तीचा आधार घेत सरांनी मन कसं असतं, त्यावर नियंत्रण कसे ठेवावे, मन आपली ताकद कशी बनू शकते, याविषयी चर्चा केली.

२) वक्ते – अक्षय कदम दादा, विषय – मैत्री कुटुंबाशी. दादाने प्रश्नोत्तरामधून विभक्त आणि एकत्र कुटुंब यावर चर्चा घेतली. याचे फायदे/तोटे काय होतात आणि या दोन्ही गटातील सकारात्मक मुद्द्यावर आधारित समारोप केला. यात दादाने वाढणारी चिडचिड, घरचा हरवत जाणारा संवाद, नात्यात येणारा दुरावा हे टाळण्यासाठी काय करता येईल यावर संवाद साधला.

३) वक्ते – सौगंध देशमुख दादा, विषय – मैत्री कुटुंबाशी – घरातील वातावरण आनंदी, मैत्रीपूर्ण ठेवण्यासाठी माझी भूमिका कशी असावी यावर संवाद झाला. दादाने मैत्रीचे चार प्रकार सांगितले. शत्रुत्व, भांडण, कामापुरते बोलणे, कामाशिवाय बोलणे हे चार टप्पे समजावून सांगितले.

४) मंदार पोफळे – विषय – मैत्री वर्धिनीशी – दादाने PPT च्या माध्यमातून वर्धिनीत घडलेल्या आज चांगल्या पदावर कार्यरत असलेल्या वर्धिकांशी ओळख, वर्धिनीचे विभाग आणि कामाचे महत्त्व, घडलेल्या यशोकथा या मुद्द्यावर संवाद साधला.

दुपारच्या वेळात मुलींनी वर्धिनीचा माहितीपट पाहिला. बऱ्याच मुली संस्थेमध्ये प्रथम आल्या होत्या. त्यांनी वर्धिनीत फिरून सर्व विभाग, कार्यालय, अभ्यासिका, ग्रंथालय यांची माहिती घेतली. दिवसभर 'मैत्री वर्धिनीशी' या विषयावर मुलींनी विविध माध्यमातून माहिती मिळवली. यावर आधारित प्रश्नमंजुषा 'कौन बनेगा शिबिरपती' घेण्यात आली. अतिशय चुरशीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्पर्धा पार पडली.

● **समारोप :** शिबिराचा समारोप करताना श्री. अरविंद केळकर सरांनी आपण वेळेसोबत मैत्री कशी करू शकतो हे सांगितले. सरांच्या हस्ते स्पर्धांची बक्षीसे मुलींना दिली.











# पाकोळी बालवाडी



नवरात्र आणि दिवाळी या सणामुळे सगळीकडे स्वच्छता करायला सुरुवात होते. याचा परिपाठ मुलांना २ ऑक्टोबर गांधी जयंती साजरी करताना मिळाला. मुलांनी सर्व वर्ग ताईंच्या मदतीने स्वच्छ केले आणि घरी आईला अशीच मदत करीन हे आश्वासन दिले. मोनाली ताईंनी गांधीजींची गोष्ट व गाणे सांगितले.

नवरात्रीनिमित्त मोठ्या गटात 'धान्य रुजवणे' हा प्रकल्प झाला. मुलांनी धान्य पेरून रोज त्याचे निरीक्षण करून वनस्पतीच्या वाढीचे टप्पे समजून घेतले. भोंडल्याला सर्वजण नटून आले आणि हत्तीची पूजा करून फेर धरून गाणी म्हटली. खंडेनवमीला वर्ग झेंडूच्या माळांनी सजवून सर्वांनी पाटी पूजन, सरस्वती पूजन, शैक्षणिक साहित्य पूजन केले.

- दि. ११ ऑक्टोबरला मोठ्या गटाची भाजी आणि मासे विक्री मंडईत सहल गेली. तेथे सर्व भाजी विक्रेत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे मुलांना भाजी, फळे हाताळता आली. वजन करता आले. विविध मासे बघता आले.
- दि. १३ ऑक्टोबरला सर्व गटातील पालकांची पालकसभा झाली. श्री. विवेक देशपांडे यांनी 'पर्यावरण संरक्षण' हा विषय मांडताना आपला वैयक्तिक सहभाग कसा असावा हे सप्रयोग सांगितले. पालकांनी दिलेल्या अभिप्रायातून ही आपली जबाबदारी आहे हे समजल्याचे जाणवले.
- दि. १८ ऑक्टोबरला मुलांचे वाढदिवस पालकांच्या सहभागातून साजरे झाले. क्रिशा खंडेलवाल हिच्या व मधल्या गटातील मुलांच्या पालकांनी मुलांना शिरा, राजगिरा लाडू, खजूर खाऊ दिला.
- दि. २० ऑक्टोबरला बालवाडीची दिवाळी साजरी झाली. मुलांनी आणलेल्या आकाशकंदीलांनी, पणत्यांनी, रांगोळ्यांनी वर्ग सजले. दिवाळीतल्या सर्व दिवसांची ताईंनी माहिती सांगितली. गाणी म्हणत दिवाळीच्या फराळाचा आनंद मुलांनी घेतला.







